आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
७ ऑक्टोबर २०२५ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- राज्यातल्या अतिवृष्टीग्रस्तांसाठी ३१ हजार ६२८ कोटी रुपये अर्थसहाय्य जाहीर / दिवाळीपूर्वी जास्तीत जास्त मदत वितरण करण्याचा प्रयत्न करु असं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन

- तंत्रज्ञानाचा वापर हत्यार म्हणून होता कामा नये, तर जनतेच्या कल्याणासाठी झाला पाहिजे असं केंद्रीय अर्थमंत्र्यांचं प्रतिपादन

- प्रधानमंत्री उद्यापासून दोन दिवस महाराष्ट्राच्या दौऱ्यावर / नवी मुंबई विमानतळाचं करणार उद्घाटन

**आणि**

- कुणबी मराठयांना ओबीसी प्रमाणपत्र देण्याच्या शासननिर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाची राज्य शासनाला नोटीस

**<><><><><>**

राज्यात पुराचा फटका बसलेल्यांना राज्य सरकारकडून ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचं पॅकेज देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली. यापैकी जास्तीत जास्त नुकसानभरपाई दिवाळीच्या आधी देण्याचा प्रयत्न करू, असं आश्वासनही त्यांनी दिलं. मुंबईत आज मंत्रिमंडळ बैठकीनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासोबत त्यांनी वार्ताहर परिषदेला संबोधित केलं. राज्यातल्या एकंदर ६८ लाख ६९ हजार ७५३ हेक्टरवरच्या पिकाचं नुकसान झालं असून २९ जिल्ह्यांमधल्या  २५३ तालुक्यांत २ हजार ५९ मंडळांतल्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देणार असल्याचं ते म्हणाले. विहिरी, पायाभूत सुविधा पुन्हा उभारण्यासाठी, तसंच घरं, गोठे, दुकानं, जनावरांचं नुकसान झालेल्यांनाही अर्थसहाय्य देणार असल्याचं फडणवीस यांनी सांगितलं. तसंच,

खरडून गेलेल्या जमिनीसाठी ४७ हजार रुपये प्रति हेक्टर रोख नुकसानभरपाई, तर ३ लाख रुपये प्रति हेक्टर इतकी भरपाई मनरेगाच्या माध्यमातून देऊ, अशी माहितीही त्यांनी दिली. दुष्काळाच्या तरतुदी इथंही लागू करून त्यानुसार कार्यवाही करू, असा पुनरुच्चार फडणवीस यांनी केला.

**<><><><><>**

तंत्रज्ञानाचा वापर हत्यार म्हणून नव्हे, तर जनतेच्या कल्याणासाठी झाला पाहिजे असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्या आज मुंबईत सहाव्या ग्लोबल फिनटेक फेस्टचं उद्घाटन करताना बोलत होत्या. तंत्रज्ञानाच्या वापरामुळे कार्यक्षमतेत वाढ होते आणि भ्रष्टाचाराला आळा बसतो असं सांगतानाच त्यांनी थेट लाभ हस्तांतरण पद्धतीचं उदाहरण दिलं. लाभार्थ्यांना हवं तिथे पैसा वापरण्याची संधी मिळाल्यामुळे बचत ठेवींमधे ४ लाख ३१ हजार कोटी रुपयांची भर पडली आहे असं त्या म्हणाल्या....

**होल्ड- बाईट-**

फिनटेक कंपन्यांनी उत्पन्न वाढ, अभिनव उत्पादनं, जोखीम व्यवस्थापन या मूलभूत क्षेत्रावर भर द्यावा, असं आवाहन अर्थमंत्री सीतारामन यांनी केलं.

गिफ्ट सिटी इथं परदेशी चलन व्यवस्थापन यंत्रणेचा प्रारंभही यावेळी केला. या प्रणालीमुळे गिफ्ट सिटीत परदेशी चलनातले व्यवहार रिअल टाईममध्ये पूर्ण होतील, अशी माहिती त्यांनी दिली. सध्या यासाठी ३६ ते ५४ तास लागतात.

कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित आधुनिक जगासाठी वित्तीय उपलब्धता ही यंदाच्या फिनटेक महोत्सवाची संकल्पना आहे. प्रधान मंत्री नरेंद्र मोदी आणि ब्रिटनचे प्रधानमंत्री केयर स्टार्मर येत्या गुरुवारी या महोत्सवात सहभागी होणार आहेत. उद्योग क्षेत्रातले तज्ञ, धोरणकर्ते आणि नवोन्मेषकांशी ते यावेळी संवाद साधतील.

**<><><><><>**

ब्रिटनचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर उद्या भारत दौऱ्यावर येत आहेत. स्टार्मर यांची ही पहिलीच भारत भेट आहे. ९ ऑक्टोबर रोजी स्टार्मर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची मुंबईत भेट घेतील आणि भारत-ब्रिटन द्विपक्षीय संबंधाचा आढावा घेतील. यावेळी दोन्ही नेते विविध उद्योगांच्या प्रमुखांशीही चर्चा करणार आहेत. तसंच प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर चर्चा करणार आहेत. भारत आणि ब्रिटनमध्ये व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष, संरक्षण आणि सुरक्षा, पर्यावरण आणि ऊर्जा, आरोग्य, शिक्षण अशा विविध क्षेत्रांबाबत दहा वर्षांच्या भागीदारीचं धोरण आखण्यात आलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून दोन दिवस महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येत आहेत. उद्या ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचं उद्घाटन करतील. येत्या डिसेंबर पासून या विमानतळावरुन उड्डाणांना सुरुवात होईल. मुंबई महानगरप्रदेशातला हा दुसरा विमानतळ असून यामुळे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरचा भार कमी होणार आहे. या विमानतळाची वार्षिक प्रवासी क्षमता ९ कोटी असेल.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाचं उद्घाटन उद्या होत आहे. या पार्श्वभूमीवर नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत वाहतुकीचं नियमन करण्यात आलं आहे. त्यानुसार शहरात सर्व प्रकारच्या जड-अवजड मालवाहतूक करणाऱ्या वाहनांना उद्या सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत पूर्णतः बंदी राहील. मात्र जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक करणारी वाहनं, पोलीस, अग्निशमन दल, रुग्णवाहिका, शासकीय वाहनं इत्यादींना यातून वगळण्यात आलं आहे.

या दौऱ्यात प्रधानमंत्री मोदी मुंबई मेट्रो-३ चं लोकार्पण करणार आहेत. शहराच्या वाहतूक व्यवस्थेतला हा एक महत्त्वाचा टप्पा ठरेल. त्यानंतर प्रधानमंत्री, 'मुंबई वन', या भारताच्या पहिल्या एकात्मिक मोबिलिटी ॲपचं, तसंच अल्पकालीन रोजगारक्षम उपक्रमाचं उद्घाटन करतील. हा उपक्रम राज्यातली चारशे तंत्रनिकेतन महाविद्यालयं तसंच दीडशे शासकीय तांत्रिक माध्यमिक विद्यालयांमधे राबवला जाईल.

**<><><><><>**

कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा नोंदी असलेल्यांना ओबीसी प्रमाणपत्र देण्याच्या शासन निर्णयाला स्थगिती द्यायला मुंबई उच्च न्यायालयानं आज नकार दिला. या शासन निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर राज्याच्या सामाजिक न्याय विभागानं उत्तर द्यावं, असे आदेश मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठानं दिले. गेल्या २ सप्टेंबर रोजी हा शासन निर्णय जारी झाला होता.

**<><><><><>**

मतदार यांद्यांच्या सखोल पुनरीक्षणाची प्रक्रिया देशभरात राबवण्यात येणार असल्याचं मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी जाहीर केलं. ते नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत बोलत होते. देशभरात मतदारयाद्यांचं सखोल पुनरिक्षण करण्यासाठी निवडणूक आयोग तयारी करत असून याच्या तारखा निश्चित करून लवकर याची घोषणा करण्यात येईल, असं त्यांनी यावेळी सांगितलं. निवडणूक आयोगाने बिहारमधे सखोल पुनरिक्षणाची प्रक्रिया नुकतीच केली, यात ६९ लाख जणांचं नाव मतदार यादीतून वगळण्यात आलं. त्यानंतर बिहारमधे मतदारांची संख्या ७ कोटी ४३ लाख इतकी असल्याचं स्पष्ट झालं. मतदार यादी अधिक पारदर्शक करणं हे याचं उद्दिष्ट असल्याचं मुख्य आयुक्तांनी सांगितलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतल्याला आज २५ वर्ष पूर्ण झाली. सरकारचे प्रमुख या नात्याने गेली २५ वर्ष आपण आमूलाग्र बदलाचे साक्षीदार असल्याचं प्रधानमंत्र्यांनी यानिमित्त लिहिलेल्या संदेशात म्हटलं आहे. आरोग्य, सामाजिक सुरक्षा, महिला, युवक आणि शेतकरी सक्षमीकरण, या क्षेत्रात सुरु केलेल्या कामाबरोबरच त्यांनी आत्मनिर्भरता या उद्दिष्टाला महत्त्व दिलं आहे. या २५ वर्षांच्या कालावधीत जनतेने दाखवलेल्या विश्वासाबद्दल त्यांनी आभार मानले आहेत. या प्रवासातल्या महत्त्वाच्या टप्प्यांचा उल्लेख त्यांनी समाजमाध्यमावर छायाचित्रांसह केला आहे.

**<><><><><>**

देशाच्या विविध भागांमध्ये आज वाल्मिकी जयंती साजरी होत आहे. रामायण ज्यांनी लिहिलं, त्या महर्षी वाल्मिकी यांना 'आदि कवी' किंवा संस्कृत भाषेचे पहिले कवी म्हणूनही आदरणीय मानलं जातं. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, आणि प्रधानमंत्र्यांनी वाल्मिकी जयंती निमित्त देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. मुंबईत राजभवन इथं वाल्मिकी जयंती निमित्त महर्षी वाल्मिकींच्या प्रतिमेचं पूजन करण्यात आलं.उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयात महर्षि वाल्मिकी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

**<><><><><>**

विद्यार्थ्यांमध्ये नवोन्मेषाला चालना देण्यासाठी शिक्षण मंत्रालय आणि नीति आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने बिल्डेथॉन २०२५ हा उपक्रम राबवण्यात येत आहे. इयत्ता सहावी ते बारावीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या नवकल्पना घेऊन या उपक्रमात नोंदणी करण्याचं आवाहन शिक्षण मंत्रालयानं केलं आहे. आत्मनिर्भर भारत, व्होकल फॉर लोकल यासाठी तरुण नवोन्मेषकांना प्रोत्साहन देणं, हे या उपक्रमाचं उद्दीष्ट

आहे. विद्यार्थ्यांना व्हीबीबी डॉट एम आय सी डॉट जीओव्ही डॉट इन या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल.

**<><><><><>**

नांदेड जिल्ह्यातल्या १६ पंचायत समितींच्या सभापती पदांसाठी आरक्षण सोडत येत्या १० ऑक्टोबर रोजी होणार आहे. तर लातूर जिल्ह्यात उदगीर, अहमदपूर, निलंगा, औसा नगरपरिषद आणि रेणापूर नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी सदस्य पदाची आरक्षण सोडत उद्या काढण्यात येणार आहे.

**//<><><><><>//**